आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२७ मे २०२४ - सोमवार

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळानं मार्चमधे घेतलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र, म्हणजेच इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल आज जाहीर झाला. यंदा या परीक्षेत ९५ पूर्णांक  ८१ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. दहावीच्या परीक्षेसाठी यंदा राज्यातल्या  नऊ विभागीय मंडळातून १५  लाख  ४९ हजार  ३२६ नियमित विद्यार्थी बसले होते, त्यापैकी १४ लाख ८४ हजार ४४१  जण उत्तीर्ण झाले आहेत.

गेल्यावर्षी पेक्षा यंदा निकाल १ पूर्णांक ९८ टक्क्यांनी  वाढला आहे. राज्यात मुलींची उत्तीर्ण होण्याची  टक्केवारी ९७ पूर्णांक २१ टक्के इतकी आहे, तर ९४ पूर्णांक ५६ टक्के इतकी मुलं उत्तीर्ण झाली आहेत. कोकण विभागाचा निकाल सर्वाधिक  म्हणजे ९९ पूर्णांक १ टक्के लागला असून मुंबई विभागाचा निकाल ९५ पूर्णांक ८३ टक्के इतका आहे. ७२ पैकी १८ विषयांचा निकाल १०० टक्के लागला आहे. तर १८७ विद्यार्थ्यांना प्रत्येकी १०० टक्के गुण मिळाले आहेत.

**<><><><><>**

विधान परिषदेच्या कोकण विभाग पदवीधर मतदारसंघासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने अभिजित पानसे यांची उमेदवारी जाहीर केली आहे. मनसेचे सरचिटणीस शिरीष सावंत यांनी ही घोषणा केली. विधान परिषदेच्या चार जागांसाठी २६ जून रोजी मतदान होणार आहे.

**<><><><><>**

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर मुंबईतल्या नालेसफाईची पाहणी केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी आज केली. पावसाळ्यापूर्वी ही सगळी काम पूर्ण करावीत, असं त्यांनी म्हटलं.

<><><><><>

भारतीय खेळाडू दीपा कर्माकरनं उझबेकिस्तानमधे ताश्कंद इथल्या अशियाई चॅम्पियन स्पर्धेत महिलांच्या वॉल्टमध्ये सुवर्णपदक जिंकून इतिहास रचला आहे. दीपानं १३ पूर्णांक ५६ शतांश गुणांसह हा विजय मिळवला आहे. कोणत्याही भारतीय खेळाडूनंनं या स्पर्धेत सुवर्ण पदक जिंकण्याची ही पहिलीच वेळ आहे. दीपा कर्माकर २०१६ साली झालेल्या रियो ऑलिंपिक स्पर्धेत भाग घेणारी ही, पहिली भारतीय स्पर्धक ठरली होती.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत कोलकाता नाईट रायडर्सनं विजेतेपद पटकावलं आहे. काल चेन्नईत झालेल्या अंतिम सामन्यात कोलकाता संघाने सनरायझर्स हैदराबादचा ८ आठ गडी राखून पराभव केला. हैदराबाद संघानं प्रथम फलंदाजी करत दिलेलं ११४ धावांचं आव्हान कोलकाता संघानं अकराव्या षटकांत दोन गड्यांच्या मोबदल्यात सहज साध्य केलं.

तीन षटकांत चौदा धावा देत, दोन बळी घेणारा मायकल स्टार्क सामनावीर ठरला. वेस्टइंडीजचा सुनील नारायण मालिकावीर पुरस्काराचा, विराट कोहली ऑरेंज कॅपचा तर हर्षल पटेल पर्पल कॅपचा मानकरी ठरला.

<><><><><>

एफआयएच हॉकी प्रो लीग युरोपीय स्पर्धेच्या चौथ्या सामन्यात भारतानं हरमनप्रीत सिंहच्या हॅटट्रिकच्या जोरावर अर्जेंटिनाचा ५-४ असा पराभव केला. भारतासाठी अरैजीत सिंह हुंदल आणि गुरजंत सिंह यांनी प्रत्येकी एक आणि

हरमनप्रीत सिंहनं तीन गोल नोंदवले. भारताचा पुढचा सामना १ जूनला जर्मनीसोबत होणार आहे.

<><><><><>

पुण्याच्या कल्याणी नगर भागात झालेल्या पोर्शे कार अपघात प्रकरणात पुणे पोलिसांनी ससून रुग्णालयाच्या न्यायपूरक विज्ञान विभागाचे प्रमुख डॉ. अजय टावरे आणि डॉ. श्रीहरी हरलोर यांना अटक केली आहे. अल्पवयीन आरोपीच्या रक्ताच्या नमुन्यांमध्ये फेरफार केल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. १९ मे रोजी रात्री या आरोपीनं नशेच्या अंमलाखाली भरधाव वेगानं कार चालवून दोन अभियंत्यांचे बळी घेतले. या आरोपीच्या रक्ताचे नमुने तपासणीसाठी ससून रुग्णालयात पाठवले होते. त्यात या डॉक्टरांनी फेरबदल केल्याचं पोलिसांचं म्हणणं आहे.

<><><><><>

गुजरातच्या राजकोट इथं गेमझोनला लागलेल्या आगप्रकरणी गुजरात सरकारनं दोन पोलीस अधिकाऱ्यांसह सात अधिकाऱ्यांना निलंबित केलं आहे. या अधिकाऱ्यांचं कामातलं दुर्लक्ष आणि विलंब या घटनेला कारणीभूत असल्यामुळे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांनी या अधिकाऱ्यांना तत्काळ निलंबित करण्याचे आदेश दिले आहेत.

<><><><><>

रोजगार हमी योजनेच्या कामावर बोगस मजूर दाखवून शासनाचे पैसे लाटण्याचा प्रकार भंडारा जिल्ह्यात तुमसर तालुक्यातल्या खैरलांजी इथं उघडकीला आला आहे. ग्रामपंचायत सदस्यांनी याबाबत गटविकास

अधिकाऱ्यांकडे तक्रार करून दोषी रोजगार सेवकावर कारवाईची मागणी केली आहे. याविषयी चौकशी सुरु असल्याचं गटविकास अधिकाऱ्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

मालेगावचे माजी महापौर अब्दुल मलिक युनूस ईसा यांच्यावर मध्यरात्री अज्ञात हल्लेखोरांनी गोळीबार केला. या हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी नाशिकच्या खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. या घटनेनंतर मालेगावात पोलीस बंदोबस्तात वाढ करण्यात आली आहे.

**//<><><><><>//**